SAMPLE CONTENT

# SMART NOTES

इयत्ता अकरावी

# अर्थशास्त्र



Target Publications® Pvt. Ltd.

# SMART NOTES

# अर्थशास्त्र

## इयत्ता अकरावी

(महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या व २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यात आलेल्या अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित.)

**ठळक वैशिष्ट्ये**

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.
- प्रश्नोत्तरांच्या स्वरूपामध्ये पाठांचा परिपूर्ण आढावा.
- परीक्षेच्या दृष्टीने उत्तरांची सुयोग्य मांडणी.
- मुद्दे लक्षात ठेवण्यासाठी ‘झटपट उजळणी’ समाविष्ट.
- ‘ज्ञानात भर’ या शीर्षकांतर्गत संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण.
- संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा ‘ज्ञानगुरू’ समाविष्ट.
- विषयासंदर्भात अधिक माहिती देणारे Q. R. Codes उपलब्ध.
- दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा समावेश.
- उत्तरे लक्षात राहण्याकरता महत्त्वपूर्ण शब्द ठळक स्वरूपात.
- प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला पाठाचा आढावा घेण्याकरता प्रश्नांची सारणी

Sample Conent

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2183**

P.O. No. 2975

## प्रस्तावना

टार्गेट प्रकाशनाचे **Smart Notes अर्थशास्त्र इयत्ता अकरावी** हे पुस्तक विद्यार्थ्यांचे या विषयाचे आकलन व ज्ञान समृद्ध करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजतील व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

या पुस्तकात पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेतच. सोबतच पाठांचा संपूर्ण आढावा घेण्याच्या दृष्टीने काही अधिकच्या प्रश्नांचाही यात समावेश करण्यात आला आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे ही सविस्तर, मुद्देसूद व परीक्षेच्या दृष्टीने आदर्श उत्तरे आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाणे सोपे जाईल.

दीर्घ व अवघड उत्तरे सहज लक्षात राहावीत म्हणून आवश्यक तेथे 'झटपट उजळणी' देण्यात आली आहे. शक्य तेथे महत्त्वाचे शब्द ठळक करून देण्यात आले आहेत. ज्यामुळे, उत्तर लक्षात ठेवणे सोपे जाईल. संकल्पनांचे आकलन उत्तमरीतीने व्हावे याकरता आवश्यक तेथे 'ज्ञानात भर' या शीर्षकाखाली मुद्द्याचे अधिक स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच, संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा 'ज्ञानगुरू' रंजक व व्यावहारिक माहिती देण्यासाठी तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल. काही मुद्द्यांसंदर्भात अधिकची माहिती देण्यासाठी या पुस्तकात अनेक ठिकाणी Q. R. Codes समाविष्ट करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांचे विषयाचे ज्ञान सखोल व परिपूर्ण करणारी या पुस्तकाची अनोखी रचना विद्यार्थी, पालक व शिक्षक सर्वांच्याच पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी: mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'अर्थशास्त्र; पहिले पुनर्मुद्रण: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

## ‘अर्थशास्त्र’ हा विषय का शिकावा?

परीक्षेत उत्तम गुण मिळवण्यासोबतच हा विषय शिकण्याचे इतरही अनेक फायदे आहेत.

१. अर्थशास्त्र या विषयाचा तुम्ही दैनंदिन जीवनातही अनेक वेळा अनुभव घेता. या विषयाच्या अभ्यासामुळे तुम्हांला तुमच्या अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे मिळतील. त्याचबरोबर, आपल्या अवतीभवतीच्या जगाविषयी तुम्ही अधिक सजग व्हाल.

२. हा विषय तुम्हांला मानवाचे आर्थिक वर्तन अधिक व्यवस्थित समजून घेण्यात मदत करतो. एखादी व्यक्ती एखाद्या विशिष्ट आर्थिक स्थितीमध्ये एक विशिष्ट प्रतिक्रिया का देते, ह्याचे स्पष्टीकरण विविध अर्थशास्त्रीय सिद्धान्तांतून मिळते.

३. आपण बचत का करतो, एखाद्या वस्तूची किंमत ही ‘क्ष’ का निश्चित करण्यात आली आहे, एखाद्या जागेचे भाडे इतर जागांच्या तुलनेने जास्त का आहे, व्याजदर सतत बदलत का राहतात, बँकांची आवश्यकता का आहे, दोन पर्यायी वस्तूंची किंमत साधारणतः सारखीच का असते, आर्थिक मंदी व तेजी कशामुळे येते यांसारख्या अनेक गोष्टींचे स्पष्टीकरण या विषयाच्या अभ्यासातून मिळते.

४. आपण बरेचवेळा शासनाच्या विविध धोरणांवर टीका करतो; पण शासनाची काही उद्दिष्टे, तसेच काही मर्यादाही असतात. अर्थशास्त्र आपल्याला ही बाजू समजून घेण्यात मदत करते.

तुमच्या संपूर्ण शैक्षणिक वाटचालीत अर्थशास्त्राची सोबत तुम्हांला लाभणारच आहे. इथून पुढे वाणिज्य क्षेत्रातील कोणताही अभ्यासक्रम (कोर्स) तुम्ही निवडलात, तरीही अर्थशास्त्राचा त्यात समावेश नक्कीच असेल.

## या पुस्तकातून अभ्यास कसा कराल?

या पुस्तकाचे दोन विभाग करण्यात आले आहेत:

**१) दीर्घोत्तरी प्रश्न** **२. वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न**

**दीर्घोत्तरी प्रश्न:**

येथे देण्यात आलेल्या प्रश्नांचा क्रम हा धड्याच्या ओघाशी मिळताजुळता आहे. त्यामुळे, एकदा तुम्ही ही सर्व प्रश्नोत्तरे वाचलीत, की तुमचा पाठ्यपुस्तकातील धडा पूर्ण वाचल्यासारखेच होईल. तेव्हा तुम्ही प्रथम ह्या विभागाचा अभ्यास करावा.

**वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न:**

हा विभाग दीर्घोत्तरी प्रश्न विभागानंतर येतो. यातील प्रश्न वस्तुनिष्ठ किंवा ज्ञानाच्या उपयोजनावर आधारित आहेत. दीर्घोत्तरी प्रश्नांचा अभ्यास केल्यानंतर ह्या विभागातील प्रश्नांची उत्तरे देणे तुम्हांला सहजसोपे होईल. शिवाय, तुमची तयारी तपासून पाहण्याकरता उत्तरे दिली आहेतच.

Sample Content

# वैशिष्ट्ये

### झटपट उजळणी

काही वेळा प्रश्नांची उत्तरे खूपच मोठी व थोडी अवघड असतात. अशा वेळी संपूर्ण उत्तर लक्षात ठेवणे अवघड जाते. यासाठी संपूर्ण उत्तराचा संक्षिप्त आढावा घेणारी 'झटपट उजळणी' या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना उजळणी करणे सोपे जाईल.

### ज्ञानात भर

काही संकल्पना थोड्या अवघड किंवा गोंधळात टाकणाऱ्या असतात. त्या समजण्यसाठी थोडेसे स्पष्टीकरण पुरेसे होत नाही. म्हणूनच, 'ज्ञानात भर' या शीर्षकांतर्गत अशा संकल्पना अधिक सुस्पष्टपणे समजावून सांगितल्या आहेत. येथे दिलेली माहिती परीक्षेत लिहिण्याची आवश्यकता नाही. ही माहिती केवळ संकल्पना चांगल्या पद्धतीने समजून घेण्याकरता आहे.

### ज्ञानगुरू

ज्ञानगुरू नावाचा एक खास मित्र तुमच्या भेटीस घेऊन येत आहोत. हा मित्र तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल आणि तुम्ही शिकत असलेल्या विषयासंबंधी तुम्हांला व्यावहारिक जीवनातील उदाहरणे किंवा रंजक माहिती देईल.

### Q. R. Codes

या विषयाचे आपल्या दैनंदिन जीवनात विविध प्रकारे उपयोजन करता येते. एखाद्या संकल्पनेशी संबंधित एखादा वर्तमानपत्रातला लेख किंवा व्हिडिओ तुम्हांला त्या संकल्पनेशी अधिक जोडून घेण्यात मदत करेल. अशी माहिती देणाऱ्या काही लिंक्स तुम्हांला Q. R. Code मार्फत दिल्या आहेत.

Sample Content

# पुस्तकात देण्यात आलेले विविध प्रश्नप्रकार

या पुस्तकात तुम्ही पुढील प्रकारांतील प्रश्नांचा अभ्यास करणार आहात.

| अनु.क्र. | प्रश्नप्रकार | पाठ १ | पाठ २ | पाठ ३ | पाठ ४ | पाठ ५ | पाठ ६ | पाठ ७ | पाठ ८ | पाठ ९ | पाठ १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | **दीर्घोत्तरी प्रश्न विभाग** | | | | | | | | | | |
| १. | खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २. | फरक स्पष्ट करा. | ✓ | NA | NA | ✓ | NA | NA | ✓ | ✓ | NA | ✓ |
| ३. | खालील उदाहरणे सोडवा. | NA | NA | ✓ | NA | NA | NA | NA | NA | NA | NA |
| ४. | पाठ्यपुस्तकातील कृती | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | **वस्तुनिष्ठ प्रश्न विभाग** | | | | | | | | | | |
| अ. | योग्य पर्याय निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ब. | विधाने आणि तर्क प्रश्न – खालीलपैकी योग्य उत्तर निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| क. | योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा. | ✓ | ✓ | – | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ड. | योग्य जोडीचा पर्याय निवडा / चुकीची जोडी ओळखा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| इ. | सहसंबंध पूर्ण करा. | ✓ | ✓ | – | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| फ. | गटात न बसणारा शब्द ओळखा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ग. | दिलेल्या विधानांसाठी योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सुचवा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा. | ✓ | ✓ | – | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील उतारा काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्या. / खालील दिलेल्या माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा. | – | ✓ | ✓ | ✓ | ✓ | – | – | – | ✓ | ✓ |
| | खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा. | – | ✓ | – | – | – | – | ✓ | – | – | – |
| | खालील उदाहरणे सोडवा. | – | – | – | – | – | ✓ | ✓ | – | – | – |

**टीप:** वरील सर्व प्रश्नप्रकार पाठ्यपुस्तकात समाविष्ट आहेत.

Sample Content

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. (दीर्घोत्तरी प्रश्न) | पृष्ठ क्र. (वस्तुनिष्ठ प्रश्न) |
|---|---|---|---|
| १. | अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना | १ | ११२ |
| २. | पैसा | १३ | ११८ |
| ३. | विभाजन मूल्य | २१ | १२५ |
| ४. | महाराष्ट्राची अर्थव्यवस्था | ४२ | १२९ |
| ५. | भारतातील ग्रामीण विकास | ५८ | १३५ |
| ६. | भारतातील लोकसंख्या | ६३ | १४१ |
| ७. | भारतातील बेरोजगारी | ७२ | १४८ |
| ८. | भारतातील दारिद्र्य | ८१ | १५५ |
| ९. | भारताचे १९९१ पासूनचे आर्थिक धोरण | ९३ | १६० |
| १०. | भारतातील आर्थिक नियोजन | १०१ | १६८ |


**टीप:** i. पाठाखाली दिलेले प्रश्न **(T)** या चिन्हाने दर्शवले आहेत.

ii. प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला प्रश्नांची सारणी देण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पाठाचा आढावा घेता येईल. तसेच, विद्यार्थ्यांनी प्रत्येक प्रश्नाचा किती वेळा अभ्यास केला ह्याची नोंद करण्याकरता प्रत्येक प्रश्नासमोर पहिले वाचन, दुसरे वाचन व तिसरे वाचन असे रकाने देण्यात आले आहेत.

Sample Content

# ८ भारतातील दारिद्र्य

| अनु.क्र. | तपशील | पहिले वाचन | दुसरे वाचन | तिसरे वाचन |
|---|---|---|---|---|
| १. | दारिद्र्य या संकल्पनेचा पारंपरिक दृष्टिकोनातून अर्थ स्पष्ट करा. भारतातील दारिद्र्याच्या इतिहासाविषयी लिहा. | | | |
| २. | बहुआयामी दारिद्र्य ही संकल्पना स्पष्ट करा. | | | |
| ३. | अमर्त्य सेन यांची दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करा. | | | |
| ४. | दारिद्र्याच्या प्रमुख संकल्पना स्पष्ट करा. किंवा<br>निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य या संकल्पना स्पष्ट करा. | | | |
| ५. | दारिद्र्याचे प्रकार कोणते? किंवा<br>ग्रामीण दारिद्र्य आणि शहरी दारिद्र्य या संकल्पना स्पष्ट करा. | | | |
| ६. | दारिद्र्यरेषा ही संकल्पना स्पष्ट करा. | | | |
| ७. | भारतातील दारिद्र्याचा अंदाज स्पष्ट करा. | | | |
| ८. | भारतातील दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा. **(T)** | | | |
| ९. | टीप लिहा: शाश्वत विकासाचे ध्येय | | | |
| १०. | दारिद्र्याचे परिणाम सांगा. | | | |
| ११. | भारतातील दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय स्पष्ट करा. **(T)** | | | |
| १२. | फरक स्पष्ट करा.<br>अ. निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य<br>ब. ग्रामीण दारिद्र्य आणि शहरी दारिद्र्य<br>क. दारिद्र्यरेषा आणि दारिद्र्य गुणोत्तर | | | |
| १३. | पाठ्यपुस्तकातील कृती | | | |

**प्रस्तावना**

भारतात एखाद्या रस्त्यावरून एक फेरफटका जरी मारला, तरी भारतात दारिद्र्य असल्याचे आपल्या लक्षात येते. भारतातील दारिद्र्याला दीर्घ इतिहास आहे. दारिद्र्य हे आपल्या अर्थव्यवस्थेसमोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला जाणवते त्यापेक्षा कितीतरी अधिक गंभीर अशी ही समस्या आहे. दारिद्र्य निर्मूलन हे स्वातंत्र्यापासूनच भारत सरकारचे महत्त्वाचे उद्दिष्ट राहिले आहे.

## प्र. १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**१. दारिद्र्य या संकल्पनेचा पारंपरिक दृष्टिकोनातून अर्थ स्पष्ट करा. भारतातील दारिद्र्याच्या इतिहासाविषयी लिहा.**

**उत्तर:** १) दारिद्र्य ही आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित संकल्पना आहे. पारंपरिक अर्थानुसार, दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा देखील पूर्ण करू शकत नाहीत अशी स्थिती होय.

२) दुसऱ्या शब्दांत, दारिद्र्य म्हणजे काही व्यक्ती किंवा समूहाला समाजापासून वंचित करणारा घटक. मूलभूत गरजांपासून वंचित राहणे किंवा उपलब्ध संधी नाकारली जाणे यामुळे समाजातील काही व्यक्ती किंवा समूह मुख्य प्रवाहापासून दूर जातात.

३) भारतातील दारिद्र्याला दीर्घ इतिहास आहे. ब्रिटिश काळात साधनसामग्रीचे आर्थिक नि:सारण, हस्त आणि कुटीरोद्योगांचा ऱ्हास, दडपशाहीचे आर्थिक धोरण, सातत्याने पडणारे दुष्काळ इत्यादी कारणांमुळे भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग दारिद्र्यात जगत होता.

४) आजही दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान आहे.

५) स्वातंत्र्यानंतरच्या काळात दारिद्र्य निर्मूलनावर भारत सरकारचा कायम भर राहिलेला आहे. भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी केलेले आर्थिक नियोजन, आर्थिक सुधारणा, गरिबी हटाओ कार्यक्रम यांसारख्या उपाययोजनांमुळे मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य कमी होण्यात मदत झाली आहे.

Sample Content

**२. बहुआयामी दारिद्र्य ही संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** १) दारिद्र्याची पारंपरिक संकल्पना ही केवळ मूलभूत गरजांशी निगडित होती.

२) दुसऱ्या शब्दांत, पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे काही व्यक्ती किंवा समूह समाजापासून वंचित राहणे. मूलभूत गरजांपासून वंचित राहणे किंवा उपलब्ध संधी नाकारली जाण्यामुळे समाजातील काही व्यक्ती किंवा समूह मुख्य प्रवाहापासून दूर जातात.

३) परंतु, आधुनिक युगात दारिद्र्य या संकल्पनेची व्याप्ती वाढली आहे.

४) परिणामी बहुआयामी दारिद्र्याची संकल्पना उदयास आली आहे.

५) बहुआयामी दारिद्र्य म्हणजे भौतिक व भौतिक परिमाणांपासून वंचित राहणे होय.

६) भौतिक परिमाणे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, रस्तेबांधणी, वीज, पिण्याच्या शुद्ध पाण्याची उपलब्धता या घटकांशी निगडित आहे.

७) अभौतिक परिमाणे समाजातील विविध भेदाभेदांशी संबंधित आहेत.
उदा. काही विशिष्ट धार्मिक गटांना सन्मान न मिळणे, विशिष्ट लिंगाच्या लोकांना समानतेची वागणूक न मिळणे ही अभौतिक परिमाणांपासून वंचित असल्याची उदाहरणे आहेत.

**३. अमर्त्य सेन यांची दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** १) प्रा. अमर्त्य सेन हे सुप्रसिद्ध भारतीय अर्थतज्ज्ञ असून त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

२) प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते 'दारिद्र्य म्हणजे केवळ पैसा कमी असणे नव्हे, तर मानवी जीवनात अनार्थिक क्षमतेचा अभाव असणे होय.'

३) या क्षमतांचा संबंध आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्याशी असतो.

४) **दारिद्र्याची कारणे:** त्यांच्या मते पौष्टिक व पुरेसे अन्न, आरोग्याची सुविधा, शैक्षणिक सुविधा, राजकीय आणि नागरी स्वातंत्र्य इत्यादींच्या कमतरतेचा संबंध दारिद्र्याशी येतो.

५) **दारिद्र्य कमी करण्याचे उपाय:** सेन यांच्या मते आर्थिक वृद्धीसाठी सार्वजनिक आरोग्य व शिक्षणातील सुधारणांसारख्या सामाजिक सुधारणा महत्त्वाच्या आहेत.

**४. दारिद्र्याच्या प्रमुख संकल्पना स्पष्ट करा.**

**किंवा**

**निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य या संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा देखील पूर्ण करू शकत नाहीत अशी स्थिती होय.

दारिद्र्य हे बहुआयामी आहे. भारतात दारिद्र्याच्या निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य अशा प्रमुख संकल्पना आहेत. त्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे:

१) <u>निरपेक्ष दारिद्र्य</u>

**मोजमापाचा निकष:** निरपेक्ष दारिद्र्य हे किमान उपभोगाच्या गरजांनुसार मोजले जाते. नियोजन आयोगानुसार ग्रामीण क्षेत्रांमध्ये दररोज प्रति व्यक्ती उष्मांकाचे प्रमाण २४०० उष्मांक असून शहरी क्षेत्रामध्ये २१०० उष्मांक इतके आहे. प्रत्येक व्यक्तीला सरासरी २२५० उष्मांकांची गरज असते.

सोप्या शब्दांत, जर ग्रामीण भागातील व्यक्तीला आपल्या उत्पन्नातून दररोज २४०० इतके उष्मांक प्राप्त करता येत नसतील किंवा शहरी क्षेत्रामधील व्यक्तीला २१०० इतके उष्मांक प्राप्त करता येत नसतील तर त्याला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

| प्रतिव्यक्ती आवश्यक उष्मांक - नियोजन आयोग | | |
|---|---|---|
| ग्रामीण | शहरी | सरासरी |
| २४०० | २१०० | २२५० |

किमान उत्पन्नाच्या अभावामुळे अन्नामधून उष्मांकांची समाधानकारक पातळी प्राप्त न झाल्यामुळे निरपेक्ष दारिद्र्य वाढते.

**उदाहरण:** बहुतांशी प्रमाणात हे दारिद्र्य भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये आढळून येते.

**निर्मूलन:** परिणामकारक दारिद्र्य उपाययोजनेद्वारे निरपेक्ष दारिद्र्याचे निर्मूलन करता येते.

२) **सापेक्ष दारिद्र्य**

**मोजमापाचा निकष:** सापेक्ष दारिद्र्याच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण करणे अवघड आहे. विविध राहणीमानाच्या दर्जांची तुलना केल्यानंतर सापेक्ष दारिद्र्याची कल्पना येते. उत्पन्न पातळी, संपत्ती, उपभोग खर्च, आर्थिक निष्क्रियता (बेरोजगारी, वृद्धत्व) इत्यादींच्या परस्पर तुलनेमधून या दारिद्र्याचा अभ्यास करता येतो.

**उदाहरण:** सापेक्ष दारिद्र्य जगातील सर्व देशांमध्ये आढळून येते. ही एक जागतिक घटना आहे.

**निर्मूलन:** सापेक्ष दारिद्र्याचे पूर्णत: निर्मूलन करता येत नाही; परंतु योग्य धोरण आणि उपाययोजनांमुळे त्याचे काही प्रमाणात निर्मूलन होऊ शकते.

**५. दारिद्र्याचे प्रकार कोणते?**

**किंवा**

**ग्रामीण दारिद्र्य आणि शहरी दारिद्र्य या संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर:** पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा देखील पूर्ण करू शकत नाहीत अशी स्थिती होय.

दारिद्र्याचे दोन प्रकार आहेत. ग्रामीण दारिद्र्य आणि शहरी दारिद्र्य. यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :

१) **ग्रामीण दारिद्र्य**

**अर्थ:** ग्रामीण भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोक मूळ गरजांपासून वंचित राहणे याला ग्रामीण दारिद्र्य असे म्हणतात. थोडक्यात, ग्रामीण क्षेत्रात आढळून येणाऱ्या दारिद्र्याला ग्रामीण दारिद्र्य असे म्हणतात. ग्रामीण दारिद्र्य हे सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, कंत्राटी कामगार इत्यादींमध्ये दिसून येते.

**कारणे:** शेतीतील कमी उत्पादकता, दुष्काळ, निकृष्ट ग्रामीण पायाभूत सुविधा, निरक्षरता, ग्रामीण कर्जबाजारीपणा, पर्यायी रोजगाराची कमतरता इत्यादींमुळे ग्रामीण दारिद्र्यात वाढ झाली आहे.

**परिणाम:** यामुळे ग्रामीण भागातील लोक नागरी भागांकडे रोजगाराच्या शोधासाठी स्थलांतर करतात. याचप्रमाणे समाजविरोधी आणि राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये वाढ, बचतीचे आणि गुंतवणुकीचे कमी प्रमाण, आर्थिक विषमता हे देखील याचे परिणाम आहेत.

२) **शहरी दारिद्र्य**

**अर्थ:** शहरी भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोकसंख्येत मूळ गरजांची कमतरता असणे, यास शहरी दारिद्र्य असे म्हणतात. थोडक्यात, शहरांमध्ये आढळून येणाऱ्या दारिद्र्याला शहरी दारिद्र्य असे म्हणतात.

**कारणे:** ग्रामीण भागातील लोकांचे झालेले वाढते स्थलांतर, न परवडणारी घरे, मंद गतीने औद्योगिक वृद्धी, पायाभूत सुविधांची कमतरता, निरक्षरता ही सर्व शहरी दारिद्र्याची कारणे आहेत.

**परिणाम:** शहरी दारिद्र्यामुळे झोपडपट्टी आणि अनौपचारिक क्षेत्रात वाढ होते. याशिवाय समाजात कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात.

**ज्ञानात भर**

ग्रामीण भागातील गरीब लोक रोजगाराच्या शोधामध्ये नागरी भागांकडे स्थलांतर करतात; परंतु कौशल्यांचा अभाव, रोजगाराच्या संधींचा अभाव इत्यादींमुळे त्यांना रोजगार मिळतोच असे नाही. परिणामी, ते आपल्या मूलभूत गरजा भागवण्यास असमर्थच ठरतात. 'ग्रामीण गरीब' न राहता ते 'शहरी गरीब' होतात इतकेच.

**झटपट उजळणी** **(प्रश्न क्रमांक ४ आणि ५ साठी)**

| भारतातील दारिद्र्याच्या महत्त्वाच्या संकल्पना | |
|---|---|
| निरपेक्ष दारिद्र्य | किमान उष्मांकांच्या उपभोगावरून मोजले जाते. |
| सापेक्ष दारिद्र्य | विविध राहणीमानाच्या दर्जांची तुलना करून याची कल्पना येते. |

| दारिद्र्याचे प्रकार | |
|---|---|
| ग्रामीण दारिद्र्य | ग्रामीण भागांमध्ये आढळून येणारे दारिद्र्य |
| शहरी दारिद्र्य | शहरी भागांमध्ये आढळून येणारे दारिद्र्य |

Sample Content

## ६. दारिद्र्यरेषा ही संकल्पना स्पष्ट करा.

**उत्तर:** **अर्थ**

दारिद्र्यरेषा ही अशी काल्पनिक रेषा आहे जी गरीब व गरीबेतर यांमध्ये वर्गीकरण करते. सोप्या शब्दांत, ही अर्थव्यवस्थेचे दोन भागांमध्ये वर्गीकरण करते. दारिद्र्यरेषेच्या खाली असणारे लोक (BPL) आणि दारिद्र्यरेषेच्या वर असणारे लोक (APL). दारिद्र्यरेषेच्या खाली असणारे लोक गरीब समजले जातात, तर दारिद्र्यरेषेच्या वर असणारे लोक गरीबेतर समजले जातात. कुटुंबाच्या दैनंदिन खर्चावरून हे ठरवले जाते. दारिद्र्यरेषा ही प्रत्येक राष्ट्रानुसार बदलते.

**ज्ञानात भर**

भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये दारिद्र्यरेषा ही मूलभूत गरजांच्या आधारे काढली जाते. जर एखाद्या व्यक्तीचे उत्पन्न किमान उष्मांकांची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी पुरेसे नसेल तर त्या व्यक्तीला दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती मानण्यात येते. तर विकसित राष्ट्रांमध्ये राहणीमानाची वाजवी पातळी ही दारिद्र्य रेषा ठरवण्यासाठी लक्षात घेतली जाते. म्हणजेच, जर एखादी व्यक्ती तिच्या उत्पन्नाद्वारे राहणीमानाची एक वाजवी पातळी गाठू शकत नसेल, तर ती व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली आहे असे मानले जाते.

**दारिद्र्यरेषेची व्याख्या**

विविध समित्या आणि अभ्यासगटांनी दारिद्र्यरेषेची संकल्पना विविध प्रकारे स्पष्ट केली आहे.

१) **निती आयोगाने दारिद्र्य निर्मूलनासाठी नेमलेल्या कार्यगटाच्या व्याख्येनुसार:**

सामाजिकदृष्ट्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व सेवा खरेदी करण्याकरता जो खर्च येतो त्या प्रारंभिक खर्चाच्या पातळीस दारिद्र्यरेषा म्हणतात.

२) **जागतिक बँकेनुसार:**

दारिद्र्यरेषा ही २०११ च्या किमतीनुसार दरडोई दर दिवशी $ १.९० इतक्या क्रयशक्तीच्या समानतेवर आधारित आहे. क्रयशक्तीच्या आधारानुसार भारतातील २१.२% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.

**उद्‌देश**

दारिद्र्यरेषेचे प्रमुख उद्‌देश खालीलप्रमाणे :

१) दारिद्र्यरेषेच्या खाली (BPL) आणि दारिद्र्यरेषेच्या वर (APL) असणारी लोकसंख्या ठरवणे.
२) कुटुंबाच्या उपभोग खर्चाच्या आधारे दारिद्र्याची ओळख पटवणे.
३) वेळोवेळी दारिद्र्याचा मागोवा घेऊन विविध प्रदेशांची तुलना करणे.
४) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी आवश्यक खर्चाचा अंदाज बांधणे.

**तुम्हांला माहीत आहे का?**

दारिद्र्यरेषेच्या वर राहण्यासाठी आवश्यक असणारे अन्नपदार्थ आणि इतर घटक पुढीलप्रमाणे:

| अन्नपदार्थ | इतर घटक |
|---|---|
| धान्य, डाळी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, साखर व मीठ, खाद्यतेल, अंडी, मासे व मांस, भाज्या, फळे, मसाले, पेय, प्रक्रिया केलेले खाद्य. | इंधन आणि वीज, वैद्यकीय, करमणूक, टिकाऊ वस्तू, भाडे, कपडे, अंथरूण-पांघरूण, पादत्राणे, शिक्षण, स्वच्छता, प्रसाधनाच्या वस्तू, प्रवास भत्ता. |

## ७. भारतातील दारिद्र्याचा अंदाज स्पष्ट करा.

**उत्तर:** १९६२ पासून नियोजन आयोगाने विविध काम करणारे कार्यक्षम कार्यगट, तज्ज्ञ समित्या भारतातील दारिद्र्याच्या मोजणीसाठी नेमल्या आहेत.

१) **दारिद्र्यरेषा**

सरकारने वेळोवेळी दारिद्र्यरेषा मोजण्यासाठी वेगवेगळ्या समित्यांची नियुक्ती केली. पूर्वीची दारिद्र्यरेषा ही उष्मांकांच्या उपभोगावर अवलंबून होती. त्यात इतर वस्तूंच्या उपभोगाचा समावेश नव्हता. जसे, शिक्षण, आरोग्य इत्यादी.

| प्रतिव्यक्ती आवश्यक उष्मांक - नियोजन आयोग | | |
|---|---|---|
| ग्रामीण | शहरी | सरासरी |
| २४०० | २१०० | २२५० |

Sample Content

२०१२ मध्ये, डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांचा एक गट नेमण्यात आला. या गटाने २०१४ मध्ये अहवाल सादर केला. रंगराजन गटाच्या अहवालानुसार ग्रामीण व नागरी भागाकरता दारिद्र्यरेषा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

| दारिद्र्याचा अंदाज (२०११-२०१२) | |
|---|---|
| दारिद्र्यरेषा (उपभोग खर्च रुपयात) | |
| ग्रामीण | शहर |
| ₹ ९७२/- प्रति महिना<br>(₹ ३२/- प्रति दिवस) प्रति व्यक्ती | ₹ १४०७/- प्रति महिना<br>(₹ ४७/- प्रति दिवस) प्रति व्यक्ती |

**अर्थ:** ग्रामीण भागात राहणाऱ्या व्यक्तीचे प्रति महिना उत्पन्न ₹ ९७२ पेक्षा कमी (प्रति दिवस ₹ ३२ पेक्षा कमी) असल्यास ती व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली राहत आहे असे मानण्यात येते. एखाद्या व्यक्तीला आपल्या गरजा भागवण्यासाठी आवश्यक असणारी ही किमान रक्कम आहे. त्याचप्रमाणे शहरी भागात राहणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न जर प्रति महिना ₹ १४०७ (प्रति दिवस ₹ ४७) पेक्षा कमी असेल तर ती व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली राहत असल्याचे मानण्यात येते.

२) <u>दारिद्र्य गुणोत्तर</u>

एकूण लोकसंख्येतील दारिद्र्याचे प्रमाण हे दारिद्र्य गुणोत्तराने मोजले जाते. यावरून दारिद्र्याचा विस्तार निश्चित केला जातो. रंगराजन गटाच्या अहवालानुसार दारिद्र्य गुणोत्तर पुढीलप्रमाणे:

| दारिद्र्याचा अंदाज (२०११-२०१२) | | |
|---|---|---|
| दारिद्र्य गुणोत्तर (%) | | |
| ग्रामीण | शहर | एकूण |
| ३०.९% | २६.४% | २९.५% |

**अर्थ:** २०११-१२ मध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्याचा विस्तार ३०.९% इतका तर शहरी भागातील दारिद्र्याचा विस्तार २६.४% एवढा होता. या काळासाठी संपूर्ण देशातील दारिद्र्य २९.५% एवढे होते.

खालील तक्ता राज्यनिहाय दारिद्र्याची २०११-१२ या वर्षाची टक्केवारी दाखवतो.

| राज्य | दारिद्र्याचा दर टक्केवारी (२०११-१२) | राज्य | दारिद्र्याचा दर टक्केवारी (२०११-१२) |
|---|---|---|---|
| छत्तीसगड | ३९.९ | गुजरात | १६.६ |
| झारखंड | ३६.९ | राजस्थान | १४.७ |
| बिहार | ३३.७ | तामिळनाडू | ११.३ |
| ओडिशा | ३२.६ | उत्तराखंड | ११.३ |
| आसाम | ३१.९ | हरियाणा | ११.२ |
| मध्य प्रदेश | ३१.७ | जम्मू आणि काश्मीर | १०.४ |
| उत्तर प्रदेश | २९.४ | आंध्र प्रदेश | ९.२० |
| कर्नाटक | २०.९ | पंजाब | ८.३ |
| पश्चिम बंगाल | १९.९ | हिमाचल प्रदेश | ८.१ |
| महाराष्ट्र | १७.४ | केरळ | ७.१ |

**अर्थ:** २०११-१२ मध्ये छत्तीसगडमध्ये दारिद्र्याचा विस्तार सर्वाधिक (३९.९%) होता, तर केरळमध्ये तो सर्वांत कमी (७.१%) होता. महाराष्ट्रातील दारिद्र्याचा विस्तार (१७.४%) एवढा होता.

**८. भारतातील दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा.** (T)

**उत्तर:** भारतातील दारिद्र्याला दीर्घ इतिहास आहे. ब्रिटिशकाळात साधनसामग्रीचे आर्थिक नि:सारण, हस्त व कुटीरोद्योग यांचा ऱ्हास, दडपशाहीचे आर्थिक धोरण, सातत्याने पडणारे दुष्काळ इत्यादी कारणांमुळे भारतातील लोकसंख्येचा मोठा भाग दारिद्र्यात राहत होता. आजही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील दारिद्र्य हे एक प्रमुख आव्हान आहे. भारतातील दारिद्र्याची कारणे पुढीलप्रमाणे:



Sample Content

१) **लोकसंख्येचा विस्फोट**

जेव्हा देशातील लोकसंख्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढ आणि विकासापेक्षा अधिक वेगाने वाढते, तेव्हा त्या स्थितीला लोकसंख्येचा विस्फोट असे म्हणतात. जलद गतीने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या मानाने गरजा भागवण्यासाठी असणाऱ्या साधनसंपत्तीचे वाटप असमान असते. त्यामुळे मुख्य गरजा अपूर्ण राहिल्याने दारिद्र्याचा विस्तार होतो.

२) **आर्थिक वृद्धीचा मंद वेग**

आपल्या देशात शेती व औद्योगिक क्षेत्रातील वृद्धीचा दर मंद राहिलेला आहे. परिणामी, राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यातील वृद्धीदर मंद आहे. यामुळे दारिद्र्य निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे.

३) **बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी**

ज्या परिस्थितीत १५ ते ५९ वयोगटांतील व्यक्तींना प्रचलित वेतन दरावर काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही रोजगार मिळत नाही त्या स्थितीला बेरोजगारी असे म्हणतात. अर्ध बेरोजगारी म्हणजे अशी स्थिती जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही. बेरोजगारी व अर्ध बेरोजगारी हे ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण वाढण्याचे कारण आहे.

४) **आर्थिक विषमता**

उत्पन्न, मालमत्ता, उपभोग खर्च, कर्जसुविधा, शेतजमिनीचे वाटप इत्यादींमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता आढळून येते. यामुळे दारिद्र्याची व्याप्ती वाढली आहे.

५) **पायाभूत सुविधांची दुर्लभता**

क्रयशक्तीच्या अभावामुळे दरिद्री लोक ऊर्जा, वाहतूक, संदेशवहन, आरोग्य व शिक्षण इत्यादी पायाभूत सुविधांचा लाभ घेऊ शकत नाहीत. परिणामी, ते त्यांच्या मूलभूत गरजा भागवू शकत नाहीत आणि राहणीमानाची वाजवी पातळी गाठू शकत नाहीत. यामुळे दरिद्री अजून दरिद्री होत आहेत.

६) **चलनवाढ**

जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत सातत्याने होणारी वाढ म्हणजे चलनवाढ होय. वाढत्या लोकसंख्येमुळे खाद्यपदार्थ व अन्नधान्याची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली आहे; परंतु पुरवठा त्या प्रमाणात वाढलेला नाही. परिणामी, सतत चलनवाढ होत आहे. यामुळे क्रयशक्ती कमी होऊन गरीब आणखी गरीब होतात. अन्न संकटामुळे लोकांमध्ये उपासमार, कुपोषण इत्यादींमध्ये देखील वाढ झाली आहे.

**ज्ञानात भर**


क्रयशक्ती म्हणजे एका विशिष्ट रकमेचा वापर करून विकत घेता येणाऱ्या वस्तूंचे प्रमाण. उदाहरणार्थ, पूर्वी आपण ₹ २० मध्ये २ किलो तांदूळ विकत घेऊ शकत होतो. आता ₹ २० मध्ये आपल्याला फक्त १ किलो तांदूळ विकत घेता येतो. म्हणजेच, आपण असे म्हणू शकतो, की क्रयशक्ती कमी झाली आहे.

७) **प्रादेशिक असंतुलन**

देशातील विविध राज्यांमध्ये आर्थिक संसाधनांचे वितरण विषम प्रमाणामध्ये होते. राज्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये देखील औद्योगिकीकरण, पायाभूत सुविधांची उपलब्धता, रोजगाराच्या संधी इत्यादींमध्ये प्रचंड तफावत आढळते. अशा प्रकारचे प्रादेशिक असंतुलन हेदेखील दारिद्र्याचे एक कारण आहे. उदाहरणार्थ, ओडिसा, बिहार, मध्य प्रदेश, झारखंड, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश, आसाम, सिक्कीम ही राज्ये आर्थिक विकासामध्ये मागासलेली आहेत आणि परिणामी त्यांचे दारिद्र्याचे गुणोत्तर जास्त आहे.

८) **दारिद्र्याचे दुष्टचक्र**

प्रा. रॅग्नर नर्क्स यांनी ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते, अनेक भारतीय दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. म्हणजेच, सोप्या शब्दांत त्यांनी असे मांडले, की आपण दारिद्र्याच्या चक्रात सापडलो आहोत. त्यामध्ये, कमी राष्ट्रीय उत्पन्नामुळे कमी दरडोई उत्पन्न निर्माण होते. तसेच कमी दरडोई उत्पन्नामुळे बचत कमी होते. त्यामुळे भांडवल निर्मिती व गुंतवणूक कमी होते. कमी गुंतवणुकीमुळे कमी उत्पादन होते आणि त्यामुळे रोजगारात घट होते. हे दुष्टचक्र चालूच राहते.




Sample Content

**ज्ञानात भर**

राष्ट्रीय उत्पन्न कमी असते तेव्हा दरडोई उत्पन्नही कमी असते. जेव्हा दरडोई उत्पन्न कमी असते तेव्हा लोक कमी उपभोग घेतात किंवा कमी खर्च करतात. परिणामी, वस्तू आणि सेवांसाठीची मागणी कमी असते आणि म्हणूनच उत्पादनही कमी असते. कमी उत्पादन म्हणजे उत्पादन प्रक्रियेसाठी कमी संसाधने लागतात, ज्यामुळे रोजगाराची पातळी घटते. रोजगाराची पातळी घटल्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये राष्ट्रीय उत्पन्न कमी होते आणि हे चक्र असेच चालू राहते. 'भारत गरीब असल्यामुळे भारत गरीब आहे' हे विधान यातून स्पष्ट होते.

९) **इतर घटक**

भारतातील दारिद्र्यासाठी पुढील काही घटकही जबाबदार आहेत.

i. नैसर्गिक आपत्तींची पुनरावृत्ती
ii. जात, धर्म, वर्ण व लिंगभेदभाव
iii. प्रशासकीय अकार्यक्षमता व भ्रष्टाचार
iv. सार्वजनिक वितरण पद्धतीतील अडथळे

## ९. टीप लिहा: शाश्वत विकासाचे ध्येय

**उत्तर:** १) आंतरराष्ट्रीय समुदायाने (भारत आणि इतर अनेक देशांनी) संयुक्त राष्ट्र 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्सचा' अहवाल सप्टेंबर २०१५ रोजी स्वीकारला.

२) यात पूर्णपणे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणविषयक परिणामांचा समावेश केला आहे.

३) यामध्ये लोक, ग्रह, समृद्धी, शांती व भागीदारी यांना महत्त्व आहे.

४) यामध्ये १७ SDGs असून १६९ ध्येय २०३० पर्यंत संपादित करणे अपेक्षित आहे.

५) ही ध्येये वैश्विक असून SDGs ना आकार देण्यात भारताची मुख्य भूमिका आहे.

६) वैश्विक करार करून दारिद्र्याचे स्वरूप व परिणाम पूर्णपणे संपवणे हे SDGs मधील एक ध्येय आहे.

७) संयुक्त राष्ट्रसंघाच्या दृष्टीने भारताला आदराचे स्थान असून २०३० या वर्षापर्यंत दारिद्र्य निर्मूलनासाठी शाश्वत विकासाचे ध्येय कटिबद्ध मानले गेले आहे.

८) काही SDG ध्येये पुढीलप्रमाणे:

i. ग्रहसुरक्षा
ii. स्वच्छ ऊर्जा
iii. लिंग समभाव
iv. चांगले आरोग्य
v. शांती आणि न्याय

## १०. दारिद्र्याचे परिणाम सांगा.

**उत्तर:** पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा देखील पूर्ण करू शकत नाहीत अशी स्थिती होय. दारिद्र्य ही आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित संकल्पना आहे. प्रचंड प्रमाणातील दारिद्र्यामुळे आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम होतात.

दारिद्र्याचे काही परिणाम पुढीलप्रमाणे:

**आर्थिक परिणाम**

१) दारिद्र्यामुळे देशाची आर्थिक प्रगती लांबणीवर पडते.

२) दारिद्र्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी होते.

३) त्यामुळे बचत, गुंतवणूक व भांडवल निर्मिती कमी होते.

४) आर्थिक शक्ती तीव्र होते (काही लोकांच्या हातात एकवटते) व संधीची असमानता निर्माण होते.

५) कल्याणकारी कार्यक्रमावरील अनुदानात वाढ झाल्यामुळे सरकारी खर्चात वाढ होते आणि साधनसंपत्तीचे असमान वाटप होते.

**सामाजिक परिणाम**

१) दारिद्र्यामुळे राहणीमान खालावलेले राहते. हालाखीत व कष्टप्रद जीवन जगावे लागते.

२) यामुळे श्रीमंत व गरीब वर्गात मतभेद होतात.

३) समाज व राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये वाढ होते.

याचबरोबर दारिद्र्यामुळे पर्यावरणाचा देखील ऱ्हास होतो.

दारिद्र्याचे हे सर्व परिणाम टाळण्यासाठी शासनाने दारिद्र्य निर्मूलनासाठी विविध उपाययोजना करणे आवश्यक ठरते.

Sample Content

**११. भारतातील दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय स्पष्ट करा.** T

**उत्तर:** प्रत्येक देशातील सरकार दारिद्र्य निर्मूलनासाठी विविध उपाययोजना करत असते. १७ ऑक्टोबर हा जागतिक दारिद्र्य निर्मूलन दिवस मानला जातो. भारतात दारिद्र्य निर्मूलनासाठी केले गेलेले सामान्य उपाय पुढीलप्रमाणे:

१) **लोकसंख्येवर नियंत्रण**

लोकसंख्येचा विस्फोट हे भारतातील दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे. म्हणूनच, सरकार लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध धोरणे राबवते. यात कुटुंब कल्याण कार्यक्रम व लोकसंख्येचे धोरण यांचा समावेश होतो.

२) **शेती**

सरकारने शेतीला आधार देण्यासाठी देखील अनेक उपाय योजले आहेत. उदा. शेतीसाठी लागणारी उत्पादने विकत घेण्याकरता शेतकऱ्यांना स्वस्त दरात कृषी सुविधा पुरवल्या जातात. काही पिकांसाठी किमान आधारभूत किमती जाहीर केल्या जातात जेणेकरून शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळेल.

**ज्ञानात भर**

किमान आधारभूत किंमत (MSP) म्हणजे शासनाने काही शेतकी उत्पादनांकरता दिलेली हमी किंमत असते. जर बाजारभाव किमान आधारभूत किमतीपेक्षा खाली गेला, तर सरकारी यंत्रणा या किमान आधारभूत किमतीला शेतकऱ्यांकडून शेतकी उत्पादने विकत घेते. केंद्र सरकारने (२०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये) रबी हंगामातील पिकांच्या किमान आधारभूत किमती त्यांच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट करण्याचे ठरवले.

३) **ग्रामीण कामे**

सरकार ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यावरही भर देते. ग्रामीण भागातील रस्त्यांची बांधणी, ग्रामीण विद्युतीकरण, लघु जलसिंचन सुविधा निर्मिती इत्यादी कामांच्याद्वारे ग्रामीण भागातील गरिबांना रोजगार उपलब्ध करून देता येतो.

४) **ग्रामीण औद्योगिकीकरण**

ग्रामीण भागातील औद्योगिकीकरणाच्या प्रयत्नांमुळे देखील या प्रदेशातील दारिद्र्य कमी करण्यात साहाय्य होते. उदा. ग्रामीण भागात लघुउद्योग व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे येथे रोजगार पुरवले जातात आणि त्यामुळे दारिद्र्य कमी होण्यात मदत होते.

५) **किमान वेतन**

१९४८ मध्ये किमान वेतन कायदा संमत करण्यात आला. या कायद्याअंतर्गत मजुरांना न्याय्य मोबदला देण्याची तरतूद करण्यात आली. या कायद्यात वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत. मजुरांना किमान वेतनाची हमी दिल्यामुळे त्यांना त्यांच्या मूलभूत गरजा भागवणे शक्य होते आणि त्यामुळे दारिद्र्याचे निर्मूलन होते.

६) **सार्वजनिक वितरण व्यवस्था**

गरिबांना अन्नसुरक्षा देण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे सवलतीच्या दराने शिधावाटप केंद्रांद्वारे अन्नधान्य वितरण केले जाते. सवलतीच्या दराने अन्नधान्य उपलब्ध झाल्यामुळे गरीब कुटुंबांमध्ये अन्नधान्याची निश्चिती झाली आहे.

७) **बँकांचे राष्ट्रीयीकरण**

१९६९ आणि १९८० साली बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यामागे आर्थिक अंतर्भाव करण्याचा उद्देश होता. यामुळे गरीब लोकांना कमी व्याजदरात पतसुविधा उपलब्ध होतात. यामुळे दारिद्र्य कमी होण्यास मदत होते.

**ज्ञानात भर**

१. बँकांचे राष्ट्रीयीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये देशाचे सरकार किंवा राज्य एखादा कायदा संमत करून किंवा अध्यादेशामार्फत एखाद्या खाजगी बँकेची मालकी आणि नियंत्रण स्वत:च्या ताब्यात घेते.

२. आर्थिक अंतर्भाव म्हणजेच आर्थिक समावेशन ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये सर्वांना आर्थिक सुविधा आणि आवश्यकतेनुसार पुरेशी पत सुविधा प्राप्त होण्याची हमी मिळते. यामुळे कमी उत्पन्न गट आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या व्यक्तींना अर्थसाहाय्य मिळणे शक्य होते आणि त्यांना बिगर संस्थात्मक मार्गांकडे वळावे लागत नाही.

८) **प्रगतिशील कर धोरण**

भारतामध्ये प्रगतिशील कर पद्धत अमलात आणली जाते. याचा अर्थ उत्पन्नाची पातळी जशी वाढत जाते, तशी कराची टक्केवारी वाढते. यामुळे उत्पन्न विषमता कमी होण्यात मदत होते आणि म्हणूनच दारिद्र्यनिर्मूलनामध्ये मदत होते.

Sample Content

९) **शिक्षण**

प्राथमिक शिक्षण सगळ्यांना मोफत आणि सक्तीचे करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची पटनोंदणी वाढवण्याच्या दृष्टीने शाळेमध्ये पेयजल, मुलींसाठी मोफत शिक्षण, मध्यान्ह भोजन योजना, स्वच्छतागृह सुविधा हे कार्यक्रम सुरू केले आहेत.

१०) **स्वस्त गृहनिर्माण योजना**

सरकारने ग्रामीण व नागरी भागातील गरिबांकरता पुनर्वसन कार्यक्रम आणि स्वस्त दरात घरे देण्याची सुविधादेखील पुरवली आहे.

११) **आरोग्याच्या सुविधा**

गरिबांना सवलतीच्या दरात वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी दवाखाने यांची स्थापना करण्यात आली आहे.

१२) **कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार**

रोजगार निर्मितीसाठी भारतात कौशल्य विकास हा महत्त्वाचा भाग मानला जातो. याकरता कौशल्यावर आधारित प्रशिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामुळे लोकांना उद्योजकता किंवा स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन मिळेल.

दारिद्र्यामुळे देशाची आर्थिक प्रगती मंदावते. म्हणूनच सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी सुरू केलेल्या कार्यक्रमांवर वेळोवेळी देखरेख करणे गरजेचे असते. या कार्यक्रमामधील त्रुटी व प्रगती कमी करणाऱ्या घटकांवर प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे असते.

## प्र. २ फरक स्पष्ट करा.

१. **निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य**

**उत्तर:**

| निरपेक्ष दारिद्र्य | सापेक्ष दारिद्र्य |
|---|---|
| **१) मोजमापाचा निकष** | |
| हे किमान उष्मांकांच्या उपभोगावरून मोजले जाते. पूर्वी नियोजन आयोगाने ग्रामीण क्षेत्रामधील प्रतिव्यक्ती उष्मांकांचे प्रमाण २४०० उष्मांक असे निश्चित केले होते, तर शहरी क्षेत्रांमध्ये हे प्रमाण २१०० उष्मांक इतके निश्चित केले होते. | विविध राहणीमानांच्या दर्जांची तुलना केल्यानंतर सापेक्ष दारिद्र्याची कल्पना येते. उत्पन्न पातळी, संपत्ती, उपभोग खर्च, आर्थिक निष्क्रियता (बेरोजगारी, वृद्धत्व इत्यादी) यांच्या परस्पर तुलनेमधून सापेक्ष दारिद्र्याचा अभ्यास केला जातो. |
| **२) उदाहरण** | |
| बहुतांशी प्रमाणात हे दारिद्र्य जगातील विकसनशील देशांमध्ये आढळून येते. | सापेक्ष दारिद्र्य जगातील सर्व देशांमध्ये आढळून येते. |
| **३) निर्मूलन** | |
| परिणामकारक दारिद्र्य उपाययोजनेद्वारे निरपेक्ष दारिद्र्य निर्मूलन करता येते. | या दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन करता येत नाही; परंतु योग्य धोरण व उपाययोजनांद्वारे सापेक्ष दारिद्र्याचे काही प्रमाणात निर्मूलन होऊ शकते. |

२. **ग्रामीण दारिद्र्य आणि शहरी दारिद्र्य**

**उत्तर:**

| ग्रामीण दारिद्र्य | शहरी दारिद्र्य |
|---|---|
| **१) अर्थ** | |
| ग्रामीण भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोक मूळ गरजांपासून वंचित राहणे याला ग्रामीण दारिद्र्य असे म्हणतात. | शहरी भागातील विशिष्ट क्षेत्रातील लोकसंख्येत मूळ गरजांची कमतरता असणे, यास शहरी दारिद्र्य असे म्हणतात. |
| **२) कारणे** | |
| शेतीतील कमी उत्पादकता, दुष्काळ, निकृष्ट ग्रामीण पायाभूत सुविधा, निरक्षरता, ग्रामीण कर्जबाजारीपणा, पर्यायी रोजगाराची कमतरता इत्यादींमुळे ग्रामीण दारिद्र्यात वाढ झाली आहे. | ग्रामीण भागातील लोकांचे झालेले वाढते स्थलांतर, न परवडणारी घरे, मंद गतीने औद्योगिक वृद्धी, पायाभूत सुविधांची कमतरता, निरक्षरता ही सर्व शहरी दारिद्र्याची कारणे आहेत. |
| **३) परिणाम** | |
| यामुळे ग्रामीण भागातील लोक नागरी भागांकडे रोजगाराच्या शोधासाठी स्थलांतर करतात. याचप्रमाणे इतरही सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम दिसून येतात. | शहरी दारिद्र्यामुळे झोपडपट्टी आणि अनौपचारिक क्षेत्रात वाढ होते. याशिवाय समाजात कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. |

Sample Content

**३. दारिद्र्यरेषा आणि दारिद्र्य गुणोत्तर**

**उत्तर:**

| दारिद्र्यरेषा | दारिद्र्य गुणोत्तर |
|---|---|
| **१) अर्थ** | |
| दारिद्र्यरेषा ही अशी काल्पनिक रेषा आहे जी गरीब व गरीबेतर यांमध्ये वर्गीकरण करते. कुटुंबाच्या दैनंदिन खर्चावरून हे ठरवले जाते. | एकूण लोकसंख्येतील दारिद्र्याचे प्रमाण हे दारिद्र्य गुणोत्तराने मोजले जाते. यावरून दारिद्र्याचा विस्तार निश्चित केला जातो. |
| **२) फायदे** | |
| ही अर्थव्यवस्थेचे दोन भागांमध्ये वर्गीकरण करते. दारिद्र्यरेषेच्या खाली असणारे लोक (BPL) आणि दारिद्र्यरेषेच्या वर असणारे लोक (APL). वेळोवेळी दारिद्र्याचा मागोवा घेऊन प्रदेशांची तुलना करण्यासाठी ही मदत करते. त्याचप्रमाणे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी आवश्यक खर्चाचा अंदाज बांधण्यातही ही मदत करते. | ही संकल्पना धोरणकर्त्यांना ग्रामीण आणि शहरी दारिद्र्याच्या विस्ताराचा अभ्यास करण्यात मदत करते. देशातील एकंदरीत दारिद्र्याचा विस्तार समजून घेण्यातही ही मदत करते. |
| **३) रंगराजन गटाचे अंदाज (२०११-१२)** | |
| दारिद्र्यरेषा (उपभोग खर्च)<br>**ग्रामीण क्षेत्र:** ₹ ९७२ प्रति महिना (₹ ३२ प्रति दिवस प्रति व्यक्ती)<br>**शहरी क्षेत्र:** ₹ १४०७ प्रति महिना (₹ ४७ प्रति दिवस प्रति व्यक्ती) | २०११-१२ मध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्याचा विस्तार ३०.९% इतका तर शहरी भागातील दारिद्र्याचा विस्तार २६.४% एवढा होता. या काळासाठी संपूर्ण देशातील दारिद्र्य २९.५% एवढे होते. |

## पाठ्यपुस्तकातील कृती

**१. सांगा पाहू.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५१)

**i. भारताच्या अर्थव्यवस्थेची विभागणी ग्रामीण व शहरी भागांमध्ये जाणवते.**

**ii. देशात उत्पन्न आणि संपत्तीचे न्याय्य वितरण आहे.**

**iii. सर्व नागरिकांना समान शिक्षण, आरोग्य, ऊर्जा व पिण्याचे पाणी मिळते.**

**iv. देशामध्ये भूक, उपासमार व कुपोषण इत्यादी दिसून येत नाही.**

**v. देशामध्ये स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव आहे.**

**vi. सर्व राज्यांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण समान आहे.**

**उत्तर:** विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहिणे अपेक्षित आहे.

**२. शोधा पाहू.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५१)

**निरपेक्ष दारिद्र्य असलेल्या ५ देशांची नावे जागतिक बँकेच्या अद्ययावत अहवालातून शोधा.**

**उत्तर:** जागतिक बँकेच्या अद्ययावत अहवालानुसार निरपेक्ष दारिद्र्य असलेल्या देशांमध्ये भारत, नायजेरिया, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, इथिओपिया आणि बांगलादेश यांचा समावेश होतो.

**३. सांगा पाहू.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५२)

**खाली दिलेल्या उत्पन्न मनोऱ्यात व्यक्तींचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करा.**

**i. कंत्राटी कामगार** **ii. दुकानातील विक्रेता**

**iii. बहुराष्ट्रीय कंपनीमधील मुख्याधिकारी (CEO)** **iv. कंपनीमधील विशेषाधिकारी**

**उत्तर:** उच्चांकी उत्पन्न - बहुराष्ट्रीय कंपनीमधील मुख्याधिकारी (CEO)
उच्च मध्यम उत्पन्न - कंपनीमधील विशेषाधिकारी
मध्यम उत्पन्न - दुकानातील विक्रेता
कमी उत्पन्न - कंत्राटी कामगार

Sample Content

४. **शोधा पाहू.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५२)

**अनौपचारिक क्षेत्राबद्दलची माहिती गोळा करा व तुमच्या निरीक्षणानुसार काही उपक्रम नमूद करा.**

**उत्तर:** अनौपचारिक क्षेत्राच्या उदाहरणांमध्ये भाजीविक्रेते किंवा फळविक्रेते, फेरीवाले, कारागीर इत्यादींचा समावेश होतो. या क्षेत्रातील कामगार संघटित नसतात. औपचारिक क्षेत्राच्या तुलनेत या क्षेत्रातील लोकांना कमी वेतन मिळते. तसेच नोकरीच्या सुरक्षिततेचा देखील अभाव असतो. तसेच अनौपचारिक क्षेत्रातील उत्पन्न कराच्या व्याप्तीमध्ये आणणे अवघड असल्यामुळे हे उत्पन्न देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये समाविष्ट करणे अवघड जाते.

५. **हे करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५२)

i. **दर महिन्याला तुमच्या घरात केल्या जाणाऱ्या खाद्य आणि खाद्येतर पदार्थांची यादी तयार करा.**

ii. **तुमच्या कुटुंबात चालू किमतीनुसार दरमहा केला जाणारा एकूण उपभोग खर्च दाखवा.**

iii. **कुटुंबाचा दरमहा यानुसार खर्च किती ते सांगा.**

**उत्तर:** विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहिणे अपेक्षित आहे.

६. **शोधा पाहू.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५३)

**तक्ता क्र. ८.२ मधील माहितीच्या आधारे तिसरे चतुर्थक ($Q_३$) व दहावे शतमक ($P_{१०}$) काढा व त्यानुसार राज्यांची नावे लिहा.**

**उत्तर:**

| राज्य | दारिद्र्याचा दर टक्केवारी (२०११-१२) | संचित वारंवारता |
|---|---|---|
| केरळ | ७.१ | ७.१ |
| हिमाचल प्रदेश | ८.१ | १५.२ |
| पंजाब | ८.३ | २३.५ |
| आंध्र प्रदेश | ९.२० | ३२.७ |
| जम्मू आणि काश्मीर | १०.४ | ४३.१ |
| हरियाणा | ११.२ | ५४.३ |
| उत्तराखंड | ११.३ | ६५.६ |
| तामिळनाडू | ११.३ | ७६.९ |
| राजस्थान | १४.७ | ९१.६ |
| गुजरात | १६.६ | १०८.२ |
| महाराष्ट्र | १७.४ | १२५.६ |
| पश्चिम बंगाल | १९.९ | १४५.५ |
| कर्नाटक | २०.९ | १६६.४ |
| उत्तर प्रदेश | २९.४ | १९५.८ |
| मध्य प्रदेश | ३१.७ | २२७.५ |
| आसाम | ३१.९ | २५९.४ |
| ओडिशा | ३२.६ | २९२ |
| बिहार | ३३.७ | ३२५.७ |
| झारखंड | ३६.९ | ३६२.६ |
| छत्तीसगड | ३९.९ | ४०२.५ |
| | **n = ४०२.५** | |

**तिसरे चतुर्थक ($Q_३$)**

$Q_३ = ३\left(\frac{n+१}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

म्हणून, $Q_३ = ३\left(\frac{४०२.५+१}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३ \left(\frac{४०३.५}{४}\right)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३ (१००.८८)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = (३ \times १००.८८)$ च्या पदाचे मूल्य

$Q_३ = ३०२.६३$ च्या पदाचे मूल्य

३०२.६३ च्या पदाचे मूल्य संचित वारंवारतेच्या ३२५.७ या गटामध्ये येते.

म्हणून, $Q_३$ = बिहार

**दहावे शतमक ($P_{१०}$)**

$P_{१०} = १० \left(\frac{n+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{१०} = १० \left(\frac{४०२.५+१}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{१०} = १० \left(\frac{४०३.५}{१००}\right)$ च्या पदाचे मूल्य

$P_{१०} = १० (४.०३५)$ च्या पदाचे मूल्य

$P_{१०} = ४०.३५$ च्या पदाचे मूल्य

४०.३५ च्या पदाचे मूल्य संचित वारंवारतेच्या ४३.१ या गटामध्ये येते.

म्हणून, $P_{१०}$ = जम्मू आणि काश्मीर

७. **हे करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५५)

**अन्नसुरक्षेच्या खात्रीसाठी महाराष्ट्र सरकारने तीन रंगांचे रेशनकार्ड सुरू केले आहे. अन्नपुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार यांच्यानुसार उत्पन्न पातळीवर आधारित रेशनकार्डचा रंग ओळखा.**

उत्तर:

| रेशनकार्डचा रंग | पांढरे रेशनकार्ड | केशरी रेशनकार्ड | पिवळे रेशनकार्ड |
|---|---|---|---|
| वार्षिक उत्पन्न पातळी | ₹ १५,०००/-पर्यंत | ₹ १५,००० - १ लाख | ₹ १ लाख किंवा वरील |

८. **हे करून पाहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५५)

**खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासोबत जोड्या लावा. अन्नसुरक्षा, रोजगार व स्वयंरोजगार, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक समावेशन, गृहनिर्माण**

i. **रोजगार हमी योजना**
ii. **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना**
iii. **जन धन योजना**
iv. **स्वच्छ भारत अभियान**
v. **सर्व शिक्षा अभियान**
vi. **अंत्योदय अन्न योजना**
vii. **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**
viii. **प्रधानमंत्री आवास योजना**
ix. **राष्ट्रीय आरोग्य मिशन**

उत्तर:

| | |
|---|---|
| रोजगार हमी योजना | रोजगार |
| स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना | स्वयंरोजगार |
| जन धन योजना | आर्थिक समावेशन |
| स्वच्छ भारत अभियान | स्वच्छता |
| सर्व शिक्षा अभियान | शिक्षण |
| अंत्योदय अन्न योजना | अन्नसुरक्षा |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | रोजगार |
| प्रधानमंत्री आवास योजना | गृहनिर्माण |
| राष्ट्रीय आरोग्य मिशन | आरोग्य |

# ८ भारतातील दारिद्र्य

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. अमर्त्य सेन यांच्या दारिद्र्याच्या संकल्पनेनुसार चुकीचे विधान .
   i. पैशांचा अभाव हे दारिद्र्याचे कारण असू शकते.
   ii. अनार्थिक क्षमतेचा अभाव असणे.
   iii. राजकीय व नागरी स्वातंत्र्याच्या कमतरतेचा संबंध दारिद्र्याशी येतो.
   iv. हे केवळ भारताशी निगडित आहे.
   अ. i, ii आणि iii    ब. i, iii आणि iv    क. i आणि iii    ड. iv

२. दारिद्र्यरेषेचे उद्देश ओळखा.
   i. दारिद्र्यरेषेखाली राहणारी (BPL) लोकसंख्या ठरवणे.
   ii. श्रीमंत व मध्यमवर्गीय लोकसंख्या ठरवणे.
   iii. वेळोवेळी दारिद्र्याचा मागोवा घेऊन प्रदेशांची तुलना करणे.
   iv. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमासाठी आवश्यक खर्चाचा अंदाज बांधणे.
   अ. i, ii आणि iii    ब. i आणि iv    क. i, iii आणि iv    ड. iii आणि iv

३. _______ यांच्या परस्पर तुलनेमधून सापेक्ष दारिद्र्याचा अभ्यास केला जातो.
   i. उत्पन्न पातळी    ii. साक्षरता    iii. आरोग्य    iv. उपभोग खर्च
   अ. i, ii आणि iii    ब. i आणि iv    क. i    ड. i आणि iii

४. शहरी दारिद्र्याची कारणे ओळखा.
   i. ग्रामीण भागातील गरीब लोकांचे स्थलांतर    ii. न परवडणारी घरे
   iii. साक्षरतेचा उच्च दर    iv. झपाट्याने होणारी औद्योगिक वृद्धी
   अ. i, ii आणि iii    ब. i, iii आणि iv    क. i आणि ii    ड. ii

५. भारतातील दारिद्र्याची कारणे ओळखा.
   i. प्रशासकीय अकार्यक्षमता    ii. पूर्ण रोजगार
   iii. चलनवाढ    iv. पायाभूत सुविधांची दुर्लभता
   अ. i, ii आणि iii    ब. i, iii आणि iv    क. i आणि ii    ड. iii

६. दारिद्र्याचे परिणाम ओळखा.
   i. आर्थिक शक्ती तीव्र होणे    ii. समाजविरोधी व राष्ट्रविरोधी कारवाया
   iii. सरकारी खर्चात वाढ    iv. पर्यावरणाचा ऱ्हास
   अ. i, ii, iii आणि iv    ब. i आणि iv    क. ii, iii आणि iv    ड. iii आणि iv

७. संयुक्त राष्ट्र 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' चे योग्य वर्णन
   i. यात सामाजिक, आर्थिक व पर्यावरणविषयक परिणामांचा समावेश केलेला आहे.
   ii. यात दारिद्र्याचे प्रत्येक स्वरूप व परिणाम पूर्णपणे संपवण्याचा वैश्विक करार केला गेला आहे.
   iii. २०५० या वर्षापर्यंत दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी भारत कटिबद्ध आहे.
   iv. यामध्ये १७ SDGs असून १६९ ध्येय २०३० पर्यंत संपादित करायची आहेत.
   अ. i, ii आणि iv    ब. ii, आणि iv    क. i आणि iii    ड. iii आणि iv

Sample Content

८. दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय ओळखा.

i. सार्वजनिक वितरण व्यवस्था
ii. ग्रामीण औद्योगिकीकरण
iii. बँकांचे राष्ट्रीयीकरण
iv. प्रगतिशील कर धोरण

अ. iii आणि iv ब. i आणि iv क. ii, iii आणि iv ड. i, ii, iii आणि iv

**उत्तरे:** १ – ड २ – क ३ – ब ४ – क
५ – ब ६ – अ ७ – अ ८ – ड

**(ब) विधाने आणि तर्क प्रश्न- खालीलपैकी योग्य उत्तर निवडा. (T)**

१. **विधान (अ):** कृषी उत्पादनातील वाढीबरोबर दारिद्र्याच्या पातळीत घट होते.
**तर्कविधान (ब):** हवामानाच्या स्थितीत मोठ्या प्रमाणावर चढ-उतार झाल्यामुळे कृषी उत्पन्नात घट झाली आहे.
अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.
ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.
क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

२. **विधान (अ):** शहरी दारिद्र्य हे मुख्यत्वे ग्रामीण लोकांच्या स्थलांतरणाच्या प्रभावामुळे झाले आहे.
**तर्कविधान (ब):** ग्रामीण लोक हे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, पर्यायी नोकऱ्यांची कमतरता यांमुळे स्थलांतरित झाले.
अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.
ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.
क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**टीप:** हा प्रश्न सुधारित रूपात घेण्यात आला आहे.

३. **विधान (अ):** जगातील सर्व देशांमध्ये सापेक्ष दारिद्र्य आढळून येते.
**तर्कविधान (ब):** सापेक्ष दारिद्र्य मोजण्यासाठी तुलना करण्यासाठी उत्पन्न पातळीतील फरक हा फक्त एकमेव निकष आहे.
अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.
ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.
क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

४. **विधान (अ):** दारिद्र्यात पैशांच्या कमतरतेबरोबरच कार्यक्षमतेचीही कमतरता आढळून येते.
**तर्कविधान (ब):** भुकेचे समाधान न होणे, आरोग्य सेवेची कमतरता, राजकीय स्वातंत्र्य नाकारणे याचे रूपांतर दारिद्र्यामध्ये होते.
अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.
ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.
क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

५. **विधान (अ):** अन्नसुरक्षा, पतपुरवठा सुविधा गरिबांना सामाजिक सुरक्षिततेची हमी देते.
**तर्कविधान (ब):** प्रशासकीय व्यवस्थेतील गळती दारिद्र्य कायम राखते.
अ. विधान 'अ' सत्य आहे; पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.
ब. विधान 'अ' असत्य आहे; पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.
क. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड. दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**टीप:** हा प्रश्न सुधारित रूपात घेण्यात आला आहे.

**उत्तरे:** १ – ड २ – क ३ – अ ४ – ड ५ – ड

Sample Content

**(क) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. दारिद्र्य हे ________ घटकांशी निगडित आहे.
अ. आर्थिक ब. सामाजिक क. राजकीय ड. आर्थिक व सामाजिक

आर्थिक व सामाजिक

२. प्रत्येक व्यक्तीला सरासरी ________ उष्मांकांची गरज असते.
अ. २१०० ब. ५२०० क. २२५० ड. २४००

२२५०

३. ________ दारिद्र्य हे जगातील सर्व देशांमध्ये आढळून येते.
अ. सापेक्ष ब. निरपेक्ष क. बहुआयामी ड. पारंपरिक

सापेक्ष

४. जागतिक बँकेच्या दारिद्र्यरेषेच्या व्याख्येनुसार भारतातील ________ % लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.
अ. ७० ब. २१.२ क. ४० ड. २२.१

२१.२

५. दारिद्र्य गुणोत्तर हे ________ गुणोत्तर आहे.
अ. दरिद्री लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी ब. एकूण लोकसंख्येचे दरिद्री लोकसंख्येशी
क. ग्रामीण दारिद्र्याचे शहरी दारिद्र्याशी ड. दरिद्री लोकसंख्येचे प्रादेशिक लोकसंख्येशी

दरिद्री लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी

६. ________ हे दारिद्र्याचे कारण नाही.
अ. लोकसंख्येचा विस्फोट ब. आर्थिक वृद्धीचा मंद वेग
क. दारिद्र्याचे दुष्टचक्र ड. आर्थिक समानता

आर्थिक समानता

७. दारिद्र्याचे दुष्टचक्र ही संकल्पना ________ यांनी मांडली.
अ. रॅग्नर नर्क्स ब. अमर्त्य सेन क. रंगराजन ड. संयुक्त राष्ट्र

रॅग्नर नर्क्स

८. ________ हा दारिद्र्य निर्मूलनाचा उपाय नाही.
अ. किमान वेतन
ब. स्वस्त गृहनिर्माण योजना
क. आरोग्याच्या सुविधा पुरवणे
ड. जास्त व्याजदरात पतसुविधा उपलब्ध करून देणे

जास्त व्याजदरात पतसुविधा उपलब्ध करून देणे

**(ड) चुकीची जोडी ओळखा.**

१.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| i. | दारिद्र्य | अ. | मूलभूत गरजा पूर्ण करू न शकणे |
| ii. | किमान उष्मांक उपभोग | ब. | शहरी भागात २४०० उष्मांक |
| iii. | दारिद्र्यरेषा | क. | कुटुंबाच्या उपभोग खर्चावरून दारिद्र्याची ओळख पटवणे |

ii – ब

२.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| i. | शहरी गरिबी | अ. | सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांत आढळते. |
| ii. | दारिद्र्याचा विस्तार | ब. | दारिद्र्य गुणोत्तराने मोजले जाते. |
| iii. | शेतीतील कमी उत्पादकता | क. | ग्रामीण दारिद्र्याचे कारण |

i – अ

**(इ) सहसंबंध पूर्ण करा.**

१. भौतिक परिमाण : वस्त्र, शिक्षण : : ________ : समाजातील भेदाभेद

अभौतिक परिमाण

२. ________ : किमान उष्मांक उपभोग : : सापेक्ष गरिबी : राहणीमानांच्या दर्जांची तुलना

निरपेक्ष दारिद्र्य

३. ग्रामीण दारिद्र्य : ग्रामीण भागात आढळते : : शहरी दारिद्र्य : ________

शहरी भागांत आढळते

४. ग्रामीण दारिद्र्यरेषा (रंगराजन) : ________ : : शहरी दारिद्र्यरेषा (रंगराजन) : ₹ १४०७/- प्रति महिना

₹ ९७२/- प्रति महिना

**(फ) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

**टीप:** ह्याची कारणे केवळ आकलन सुलभ होण्यासाठी दिली आहेत.

**१. उष्मांक – २४००, १८००, २१००, २२५० (T)**

**उत्तर:** १८००

**कारण:** इतर संख्या नियोजन आयोगाने ठरवलेले प्रति व्यक्ती प्रतिदिन उष्मांकाचे प्रमाण दर्शवतात.

**२. जास्त दारिद्र्य गुणोत्तर – छत्तीसगड, झारखंड, बिहार, केरळ (T)**

**उत्तर:** केरळ

**कारण:** इतर सर्व राज्यांचे दारिद्र्य गुणोत्तर जास्त आहे.

**३. कमी बचत, कमी राष्ट्रीय उत्पन्न, कमी लोकसंख्या, कमी दरडोई उत्पन्न**

**उत्तर:** कमी लोकसंख्या

**कारण:** इतर सर्व दारिद्र्याच्या दुष्टचक्राचे घटक आहेत.

**४. रेशनकार्डाचे रंग – पांढरे, हिरवे, केशरी, पिवळे (T)**

**उत्तर:** हिरवे

**कारण:** इतर सर्व रेशनकार्डाचे रंग आहेत.

**(ग) दिलेल्या विधानासाठी योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सुचवा.**

| | | |
|---|---|---|
| १. | समाजातील काही विशिष्ट लोकांना संधी नाकारणे. **(T)** | दारिद्र्य |
| २. | दारिद्र्याच्या संकल्पनेत भौतिक आणि अभौतिक परिमाणे समाविष्ट केली जातात. **(T)** | बहुआयामी दारिद्र्य |
| ३. | दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन करता येत नाही. **(T)** | सापेक्ष दारिद्र्य |
| ४. | या दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन करता येते. | निरपेक्ष दारिद्र्य |
| ५. | लोकांच्या राहणीमानाच्या सापेक्ष दर्जाच्या आधारावर दारिद्र्याचा अभ्यास केला जातो. **(T)** | सापेक्ष दारिद्र्य |
| ६. | गरीब व गरीबेतर असे वर्गीकरण करणारी काल्पनिक रेषा | दारिद्र्यरेषा |
| ७. | सामाजिकदृष्ट्या स्वीकारल्या जाणाऱ्या पातळीवर मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक खर्चाची गरज भासते. **(T)** | दारिद्र्यरेषा |
| ८. | दरिद्री लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी गुणोत्तर | दारिद्र्य गुणोत्तर |
| ९. | सवलतीच्या दराने अन्नधान्य उपलब्ध करून देणारी व्यवस्था | सार्वजनिक वितरण व्यवस्था |

## खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा. (T)

**१. उर्मीच्या कुटुंबाची अवस्था एवढी हालाखीची आहे, की त्यांना अन्न, वस्त्र, निवारासारख्या गरजाही भागवता येत नाहीत.**

**उत्तर: संकल्पना:** दारिद्र्य (पारंपरिक अर्थानुसार)

**स्पष्टीकरण:**

i. पारंपरिक अर्थानुसार दारिद्र्य म्हणजे समाजातील व्यक्ती पुरेशा उत्पन्नाअभावी अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजादेखील पूर्ण करू शकत नाहीत अशी स्थिती होय.

ii. उर्मीचे कुटुंबीय अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनातील मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाहीत.

iii. म्हणूनच, हे उदाहरण दारिद्र्य (पारंपरिक अर्थानुसार) या संकल्पनेचे आहे.

**२. बबनची मुलगी अत्यल्प आहारातून मिळणाऱ्या कमी उष्मांकामुळे अशक्त झाली व तिला रुग्णालयात दाखल केले.**

**उत्तर: संकल्पना:** निरपेक्ष दारिद्र्य

**स्पष्टीकरण:**

i. निरपेक्ष दारिद्र्य हे किमान उष्मांक उपभोगावरून मोजले जाते.

Sample Content

ii. बबनच्या मुलीला आहारातून मिळणाऱ्या कमी उष्मांकामुळे अशक्तपणा आला व तिला रुग्णालयात दाखल करावे लागले.

iii. म्हणूनच, हे उदाहरण निरपेक्ष दारिद्र्य या संकल्पनेचे आहे, ज्यामध्ये किमान उष्मांकांचा उपभोग घेऊ न शकल्यामुळे बबनच्या मुलीला रुग्णालयात दाखल करावे लागले.

**३. धनाजीराव मोठे जमीनदार आहेत; परंतु त्यांचे वार्षिक उत्पन्न उद्योजक रावबहादुरांपेक्षा कमी आहे.**

**उत्तर: संकल्पना:** सापेक्ष दारिद्र्य

**स्पष्टीकरण:**

i. समाजातील विविध क्षेत्रांतील लोकांच्या राहणीमानाच्या दर्जांची तुलना केल्यानंतर सापेक्ष दारिद्र्याची कल्पना येते.

ii. सापेक्ष दारिद्र्याचा अभ्यास उत्पन्न पातळी, संपत्ती इत्यादींच्या परस्पर तुलनेमधून केला जातो.

iii. रावबहादुरांपेक्षा धनाजीरावांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे.

iv. म्हणूनच, हे उदाहरण सापेक्ष दारिद्र्य या संकल्पनेशी संबंधित आहे.

**४. संजयच्या कुटुंबाला पिवळ्या शिधावाटप पत्रिकेद्वारे धान्य मिळते.**

**उत्तर: संकल्पना:** दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय

**स्पष्टीकरण:**

i. दारिद्र्य निर्मूलनासाठी भारत सरकारने अनेक उपाय केले आहेत.

ii. लोकांना अन्नसुरक्षा देण्याकरता गरिबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे सवलतीच्या दराने शिधावाटप केंद्रांद्वारे अन्नधान्य वितरण केले जाते. हा दारिद्र्य निर्मूलन करण्याचा एक उपाय आहे.

iii. संजयच्या कुटुंबाला पिवळ्या शिधावाटप पत्रिकेद्वारे धान्य मिळते.

iv. म्हणूनच, हे उदाहरण दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय या संकल्पनेशी संबंधित आहे.

**५. राज्यामध्ये काही भागांत भूकबळी होतात, तर काही भागांत अन्नाची नासाडी होते असे विदारक चित्र आहे.**

**उत्तर: संकल्पना:** दारिद्र्य निर्मूलनाचे सामान्य उपाय

**स्पष्टीकरण:**

i. प्रादेशिक असंतुलन म्हणजे विविध प्रदेशांतील दरडोई उत्पन्न, साक्षरता दर, आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा, औद्योगिकीकरणाची पातळी, पायाभूत सुविधांची उपलब्धता, इत्यादींमधील प्रचंड मोठा फरक होय.

ii. राज्यामध्ये काही भागांत भूकबळी होतात, तर काही भागांत अन्नाची नासाडी होत आहे.

iii. म्हणूनच, हे उदाहरण प्रादेशिक असंतुलन या संकल्पनेशी संबंधित आहे.

## खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा.

**१. बहुआयामी दारिद्र्याच्या संकल्पनेत केवळ अभौतिक परिमाणांचा समावेश होतो.**

**उत्तर:** नाही, मी या विधानाशी सहमत नाही. बहुआयामी दारिद्र्य म्हणजे भौतिक व अभौतिक दोन्ही परिमाणांपासून वंचित राहणे.

**कारण:** दीर्घोत्तरी प्रश्न विभागातील प्र.क्र. १ – २ अभ्यासा.

**२. सापेक्ष दारिद्र्य जगात सर्वत्र आढळते. (T)**

**उत्तर:** होय, मी या विधानाशी सहमत आहे.

**कारण:** दीर्घोत्तरी प्रश्न विभागातील प्र.क्र. १ – ४ अभ्यासा.

**३. प्रादेशिक असंतुलन हे दारिद्र्याचे एकमेव कारण आहे. (T)**

**उत्तर:** नाही, मी या विधानाशी सहमत नाही. दारिद्र्याची अनेक कारणे आहेत.

**कारण:** दीर्घोत्तरी प्रश्न विभागातील प्र.क्र. १ – ८ अभ्यासा.

**४. लोकसंख्या नियंत्रण दारिद्र्य दूर करण्याचा एकमेव उपाय आहे. (T)**

**उत्तर:** नाही, मी या विधानाशी सहमत नाही. दारिद्र्य निर्मूलनाचे अनेक उपाय आहेत.

**कारण:** दीर्घोत्तरी प्रश्न विभागातील प्र.क्र. १ – ११ अभ्यासा.

# AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

## SCIENCE


### Perfect Series:
For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.


- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

### Precise Series:
For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

### Additional Books for Std. XII Science:




## COMMERCE (ENG. & MAR. MED.)

### Smart Notes:

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II

## ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for MHT-CET, NEET & JEE

### Languages:

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to download our Quill App & get free access of 1 chapter

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY

Visit Our Website